pnb punjab national bank — Together for the better — Oriental United

सर्कल साखा सेंटर ठाणे
१ला मजला, पीएनबी प्रगती टॉवर, सी-९, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,
ईमेल : cs8325@pnb.co.in

जोडपत्र-१५ (सुधारित एसएल-१०बी)

कब्जा सूचना

संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे एक पेक्षा अधिक कर्जदारांच्या बाबींमध्ये स्थावर मिळकतींकरीता
सामान्य कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरीता)

ज्याअर्थी,

पंजाब नॅशनल बँक/पंजाब नॅशनल बँकचे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या कलम १३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सदरहू सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत प्रत्येक खात्यासमोर नमूद रक्कम अदा करण्यासाठी संबंधित कर्जदारांना बोलाविण्यासाठी यानंतर प्रत्येक खात्यासमोर नमूद तारखेची मागणी सूचना जारी करण्यात आली होती.

सदरहू कर्जदारांनी रक्कम अदा करण्यास कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी प्रत्येक खात्यासमोरील नमुद तारखे रोजीस सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ८ सहवाचता सदरहू अधिनियमाच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा कब्जा घेतलेला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये. सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा पंजाब नॅशनल बँकेच्या रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या भाराअधीन राहील.

अ. क्र.	कर्जदार/गहाणदार/ हमीदार यांची नावे (मिळकतीचे मालक)	गहाण मिळकतीचे वर्णन	मागणी सूचनेची तारीख	कब्जा सूचना चिटकवल्याची तारीख	मागणी सूचनेच्या तारखेरोजीस थकबाकी रक्कम (रू.)	प्राधिकृत अधिकाऱ्यांचे नाव
१	श्री. कुणाल राजेंद्र भिसे (कर्जदार) व श्री. राजेंद्र श्याम भिसे (हमीदार)	फ्लॅट क्र. २०४, २रा मजला, मधुबन सीएचएसएल, गोकुळ नगर, चेंधारे, अलिबाग, रायगड ४०२२०१.	१८.०८.२०२२	२९.१०.२०२२	रु. १३,२५,३१८.४०/-	श्री. शंकर दास

तारण मत्तेच्या भरण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात ॲक्टच्या कलम १३ च्या पोट कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार/हमीदार/गहाणदारांचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

सही/-
शंकर दास
प्राधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक

दिनांक : २९/१०/२०२२
ठिकाण: मुंबई

इंडियन ओव्हरसीज बँक

(भारत सरकारचा उपक्रम)
ऑपेरा हाऊस शाखा (०१४०)
जीएफ, स्टार सीजे हाऊस, डॉ. डी. बी. रोड, ग्रँट रोड, मुंबई- ४००००७.

ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत बँकेकडे गहाण स्थावर मिळकतीची विक्री

ज्याअर्थी **श्री. मेघल मुकेशचंद्र मेहता आणि श्री. बिराज मुकेशचंद्र मेहता** यांनी येथील खालील परिशिष्टात अधिक विशेषतः वर्णिलेल्या स्थावर मिळकती गहाण ठेवून इंडियन ओव्हरसीज बँकेकडून पैसे कर्जाऊ घेतले आणि एनपीए म्हणून खाते वर्गीकृत झाल्यानंतर बँकेने सदरहू सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांत प्रदानाच्या तारखेपर्यंत खर्च, प्रभार इ. सह संविदात्मक दराने आणि आधारे पुढील व्याजासह एकत्रित देय ०८.०४.२०१९ रोजीस देय रु. ९१,९७,६६४/- (रुपये एक्याण्णव लाख सत्त्याण्णव हजार सहाशे चौसष्ट मात्र) अशी बँकेची थकबाकी रक्कम चुकती करण्यासाठी श्री. मेघल मुकेशचंद्र मेहता आणि श्री. बिराज मुकेशचंद्र मेहता यांना बोलाविण्यासाठी ०८.०४.२०१९ रोजी सरफैसी ॲक्ट, २००२ (ॲक्ट) च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना जारी केली होती.

ज्याअर्थी सदरहू मागणी सूचनेत सांगितल्यानुसार कर्जदार, गहाणदार आणि हमीदार यांनी बँकेला रक्कम चुकती करण्यात कसूर केल्यामुळे बँकेने बँकेच्या थकबाकीच्या वसुलीकरिता अधिनियमाच्या कलम १३(४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ अन्वये ''जे आहे जेथे आहे'' आणि ''जसे आहे जसे आहे'' तत्त्वाने तिच्या विक्रीच्या हक्कासह अधिनियमाच्या कलम १३(४) अन्वये २७.०६.२०१९ रोजी येथील खालील परिशिष्टात अधिक विशेषतः वर्णिलेल्या तारण मत्तेचा कब्जा घेतला. कब्जा घेण्याच्या तारखेस बँकेची थकबाकी ही मागणी सूचनेत नमूद तारखेपासून काही असल्यास परतावा वजा केल्यानंतर प्रदानाच्या तारखेपर्यंत खर्च, प्रभार इ. सह संविदात्मक दराने आणि आधारे पुढील व्याजासह एकत्रित देय २७.०६.२०१९ रोजीस रु. ९४,८०,४१५/- (रुपये चौऱ्याण्णव लाख ऐंशी हजार चारशे पंधरा मात्र) अशी कळविण्यात आली होती.

३१.१०.२०२२ रोजीस कर्जदारांची थकबाकी ही काही असल्यास परतावा वजा केल्यानंतर रु. १,३४,३४,९१४.२५ (रुपये एक कोटी चौतीस लाख चौतीस हजार नऊशे चौदा आणि पंचवीस पैसे मात्र) इतकी आहे.

निम्नस्वाक्षरीकार सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून खालील नमूद मिळकतीची विक्री करून बँकेची थकबाकी वसूल करण्यासाठी प्रस्तावित आहेत.

मिळकतीचे परिशिष्ट
(सीमांसह तारणांचे संपूर्ण वर्णन द्यावे)

फ्लॅट क्र. बी-३०१, ३ रा मजला, सह १ कार पार्किंग, बी विंग, ''माधुपुरी अपार्टमेंट'' अशी ज्ञात इमारत, ढाणुकर वाडी, सीटीएस क्र. १०१७, लेडी ऑफ ॲझम्पशन चर्च मागे आणि बीजेपी कार्यालयाच्या पुढे, साखी भवन, दामु अण्णा दाते मार्ग, कांदिवली पश्चिम, गाव कांदिवली, तालुका बोरिवली, जिल्हा मुंबई, महाराष्ट्र-४०००६७.

मिळकतीच्या सीमा :

उत्तर	अमेय बिल्डिंग
दक्षिण	नाला आणि सेंट जोसेफ स्कूल
पूर्व	ऑफ गोखले रोड
पश्चिम	विनित बिल्डिंग

सदर मिळकत ही वरील कर्जदारांना मंजुर केलेल्या एनपीए गृह कर्जासाठी प्राथमिक तारण आणि मे. लिओ स्टार इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मे. चामुंडा क्रिएशन्स यांची थकबाकी सुरक्षित करण्यासाठी वाढवलेली सुध्दा आहे.

लिलावाचा तपशिल:

ई-लिलावाची तारीख आणि वेळ	विक्री पुर्ण होईपर्यंत प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारासह ३०.११.२०२२ रोजी स. ११.०० ते दु. ०४.०० दरम्यान
राखीव किंमत	रु. २,०५,१६,१६२/- (१% टीडीएस सह) (रुपये दोन कोटी पाच लाख सोळा हजार एकशे बासष्ट मात्र)
इसारा अनामत रक्कम	रु. २०,५२,०००/-
इअर भरणा	आयओबी ई-लिलाव इअर खात्याच्या नावे इएफटी/एनइएफटी/आरटीजीएस मार्फत जमा (खाते क्र. १६०६०२०००००५५५५५, इंडीयन ओव्हरसीस बँक, फोर्ट शाखा, मुंबई, शाखा कोड : ००१४) आयएफसी कोड: IOBA0000014.
बोली वाढ	रु. ५०,०००/-
मिळकतीची तपासणी	२८.११.२०२२ रोजी स. ११.०० ते सायं. ५.०० वा. दरम्यान
इअर सह ऑनलाईन अर्ज सादर करण्याची तारीख	०१.११.२०२२ पासून
इअरसह बोलीसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख	२९.११.२०२२
काही असल्यास ज्ञात भार	बँकेला ज्ञात नाही
* स्थानिक स्वराज्य संस्थेची थकबाकी (मिळकत कर, पाणी, मलनिःस्सारण, वीज बिल इ.)	बँकेला तारखेरोजीस कोणताही दावा प्राप्त झालेला नाही.

*सांविधिक थकबाकी पेक्षा बँकेच्या थकबाकीला प्राधान्य.

अटी आणि शर्ती

१. मिळकती बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली बँकेचे अधिकृत सेवा पुरवठादारांचे वेबपोर्टल www.mstcecommerce.com/www.ibapi.in/ यांच्या मार्फत ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे.
२. ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी आणि शर्ती, घोषणा, ई-लिलाव बोली प्रपत्र समाविष्ट ई-लिलाव निविदा दस्तावेज वेब पोर्टल www.mstcecommerce.com/www.ibapi.in/ वर उपलब्ध आहेत.
३. इच्छुक बोलीदारांनी वैध डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट आणि ई-मेल पत्ता धारण करणे आवश्यक आहे आणि सेवा पुरवठादारांच्या वेबसाईटवर लॉगईन करून त्यांचे नाव/खाते नोंदविणे आवश्यक आहे. ते युजर आयडी आणि पासवर्ड पुरवतील जो ई-लिलाव प्रक्रियेमध्ये वापरणे आवश्यक आहे. डिजिटल सिग्नेचर संदर्भातील तपशिलाकरिता खालील नमूद पत्ता/फोन क्र./ईमेलवर सेवा पुरवठादारांशी संपर्क करावा.
४. विहीत प्रपत्रातील बोली २९.११.२०२२ रोजी सायं. ५.०० वा. पूर्वी सेवा पुरवठादार आणि प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे इअर आणि केवायसी दस्तावेजांच्या स्कॅन प्रतीसह फोटो, पॅनकार्ड आणि पत्त्याच्या पुराव्यासह वेबपोर्टल www.mstcecommerce.com/www.ibapi.in/ मार्फत ''ऑनलाईन'' सादर करणे आवश्यक आहे.
५. इअर आणि अन्य डिपॉझिट वरील विनिर्दिष्ट अशा बँकेच्या खात्यात ईएफटी/एनईएफटी/आरटीजीएसमार्फत भरणा करावे आणि इच्छुक बोलीदारांनी जमा केलेल्या इअरवर व्याज देय नाही. यशस्वी बोलीदारांची इअर विक्री किंमतीसाठी समायोजित करण्यात येईल.
६. इअरशिवाय बोली तडकाफडकी फेटाळण्यात येतील.
७. ऑनलाईन लिलाव विक्री वरील नमूद वेळेत आपोआप सुरू होईल. लिलाव/बोली ही विक्री पूर्ण होईपर्यंत ५ मिनिटांच्या आपोआप विस्तारासह सुरुवातीस १२० मिनिटांच्या कालावधीसाठी राहील.
८. मिळकत यशस्वी बोलीदारांना विकण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घोषित केलेल्या यशस्वी बोलादाराने (खरेदीदार) त्याच दिवशी आणि पुढील कामकाजाच्या दिवसापूर्वी त्वरित (इअर धरून) विक्री किंमतीच्या २५% रक्कम जमा करणे आवश्यक आहे आणि विक्री किंमतीच्या उर्वरित रक्कम लिलाव विक्री निश्चित झाल्यापासून १५ दिवसांत जमा करणे आवश्यक आहे. विहीत कालावधीत विक्री किंमतीच्या संपूर्ण रकमेचा भरणा करण्यास कसूर केल्यास तारण मत्तेसाठी बोली किंमतीच्या २५% रक्कम जप्त करण्यात येईल आणि खरेदीदाराला मिळकतीवरील सर्व दावे त्यागावे लागतील आणि मिळकतीची पुन्हा विक्री करण्यात येईल.
९. संपूर्ण विक्री किंमतीची रक्कम आणि काही असल्यास अन्य कर/प्रभार प्रदान केल्यानंतर फक्त खरेदीदाराच्या नावे विक्री प्रमाणपत्र देण्यात येईल. खरेदीदाराने कायद्यानुसार लागू नोंदणी शुल्क, स्टॅम्प ड्युटी इ. अशा अभिहस्तांतरणाकरिता देय प्रभार/शुल्क भरावे लागेल.
१०. खरेदीदाराने कायद्यानुसार लागू नोंदणी शुल्क, स्टॅम्प ड्युटी इ. अशा अभिहस्तांतरणाकरिता देय प्रभार/शुल्क भरावे लागेल.
११. कोणतेही कारण न देता बोली स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा विक्री पुढे ढकलणे किंवा रद्द करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांना राहील.
१२. मिळकत 'जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने अटीवर विकण्यात येईल. बँकेने फक्त वरीलनुसार काही असल्यास ज्ञात बोजा, सांविधिक दायित्वे दर्शविले आहेत. खरेदीदाराने लिलावामध्ये सहभागी होण्यापूर्वी त्यांच्या स्वतःच्या खर्चाने स्वतः चौकशी करावी.
१३. वरील नमूद सांविधिक थकबाकीच्या संदर्भात कोणतीही बाधा येऊ न देता सांविधिक थकबाकीपेक्षा बँकेच्या थकबाकीला प्राधान्य राहील. वरील पूर्वग्रहाशिवाय सांविधिक थकबाकी काही असल्यास खरेदीदाराने भरायची आहे. या संदर्भात बँक जबाबदार राहणार नाही.
१४. विक्री तारण धनकोंच्या निश्चितीअधीन राहील.
१५. अयशस्वी बोलीदारांची इअर बोली प्रपत्रामध्ये त्यांच्याद्वारे पुरविलेल्या बँक खात्यामध्ये ईएफटी/एनईएफटी/आरटीजीएसमार्फत परत करण्यात येईल आणि त्यांच्या ईमेलवर कळविण्यात येईल.
१६. सदर जाहिरात म्हणजे बँकेच्यावतीने कोणतेही आश्वासन किंवा सादरीकरण मानण्यात येऊ नये. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकारांच्या दावे/हक्क/थकबाकीकरिता जबाबदार राहणार नाही.
१७. आयकर अधिनियम १९६१ च्या कलम १९४ आयए सह अनुपालनामध्ये राखीव किंमतीवरील १% दराने आयकर कापून घेण्यात येईल आणि खरेदीदाराच्या पॅन क्रमांकावर भरण्यात येईल. कर फक्त राखीव किंमतीवर मोजण्यात येईल. बोलीदाराने बोली वाढविण्याच्या रकमेवर १% आयकर भरायचा आहे आणि बँक त्यासाठी कोणतीही जबाबदारी घेणार नाही.
रुपये पन्नास लाख आणि वरील स्थावर मिळकतीची विक्री/हस्तांतरणाच्या बाबतीत हस्तांतरितीने आयकरानुसार मोबदल्याच्या १% शी समान रक्कम चुकती करायची आहे.

मिळकतीचे निरीक्षण/ई-लिलावाच्या संदर्भातील पुढील तपशिलाकरिता इच्छुक बोलीदार शाखा व्यवस्थापक, इंडियन ओव्हरसीज बँक, ऑपेरा हाऊस शाखा, फोन: ०२२-४६०० १४७१/४६०० १४७२/ ४६०० १४७३ यांना संपर्क करु शकतात.

सदर प्रकाशन म्हणजे तारण मत्तेच्या विक्रीसाठी सर्वसामान्य जनतेकडून निविदा मागवून ई-लिलाव विक्री करण्याबाबत सरफैसी ॲक्ट, २००२ अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ९(१) अंतर्गत वरील कर्जाचे कर्जदार/गहाणवटदार आणि हमीदार यांना सुद्धा ३० दिवसांची सूचना आहे

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०१.११.२०२२
प्राधिकृत अधिकारी

पश्चिम रेल्वे

मान्सून खबरदारी आणि इतर विविध कामे

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, इंजी. विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८ खालील तपशिलानुसार ई-निविदा आमंत्रित करते: **निविदा सूचना क्र. बीसीटी/२२-२३/१४९ दि. ०२/११/२०२२. काम आणि ठिकाण: (१) मरीन लाइन्स ते खार सेक्शन:- (एसएसडब्ल्यू)-मुंबई सेंट्रलच्या अधिकारक्षेत्रांतर्गत वॉटर प्रूफिंगद्वारे पावसाळी खबरदारीचे काम. (२) मरीन लाइन्स ते खार विभाग:- एसएसई (डब्ल्यू II)-एमएमसीटी** च्या अधिकारक्षेत्रात सीओपी सर्व्हिस बिल्डिंग इ.चे पेंटिंग. **कामाची अंदाजे खर्च:** रु. २१३६३५३७.२९. **इअर** : रु. २५६८००/- **सादरीकरणाची तारीख आणि वेळ : २९/११/२०२२ रोजी १५.०० वाजेपर्यंत.** उघडण्याची तारीख आणि वेळ: **२९/११/२०२२ रोजी १५.३०** वाजता. **टीप:** कामाचे तपशीलवार स्वरूप, निविदा दस्तऐवजाची किंमत (परतावा न करण्यायोग्य), इअर, पात्रता निकष, कामाचे समान स्वरूप, तपशीलवार निविदा अटी, च्या संदर्भात कृपया **www.ireps.gov.in ला भेट द्या मॅन्युअल ऑफर.** 0555

Follow us on: twitter.com/WesternRly

सार्वजनिक सूचना

माझ्या ग्राहकांच्या वतीने, सर्व जनतेला सूचना देण्यात येत आहे, श्री. आशिष प्रकाश साबू आणि श्रीमती निलिमा आशिष साबू, राहणार ३०३, आरएनए कॉन्टिनेंटल, सी विंग, सुभाष नगर, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१, हे माझे अशील कालुपूर कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड कडून लिलाव/खाजगी करारांतर्गत, एसईआरएफएईएसआय कायदा, २००२ च्या तरतुदींच्या अंतर्गत शेड्यूल मालमत्ता खरेदी करण्यास इच्छुक आहे. वरील बाबी लक्षात घेऊन, माझा अशील याद्वारे जनतेला सार्वजनिक सूचित करतो की ज्यांना मालमत्तेच्या बाबत कोणतेही अधिकार, शीर्षक, याबबत स्वारस्य आहे अशा सर्व किंवा कोणत्याही व्यक्तींनी उपरोक्त ''म्हटलेली मालमत्ता'' ''इतर पक्षाच्या'' हितासाठी प्रतिकूल आहे आणि ज्यांनी आधीच कोणताही खटला, दावा, विवाद, याचिका, अपील किंवा इतर कार्यवाही केली आहे किंवा ''म्हटलेल्या मालमत्तेच्या विषयाशी संबंधित आदेश, आदेश प्राप्त केला आहे.'' किंवा ''सांगितलेल्या मालमत्तेवर'' त्यांच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी वर वर्णन केल्याप्रमाणे अशी कोणतीही कार्यवाही दाखल करण्याचा इरादा असलेले, त्यांचे सर्व आक्षेप आणि दावे त्यांच्या समर्थनीय कागदोपत्री पुराव्यांसह लिखित स्वरूपात, या सुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या कालावधीत अधोस्वाक्षरीदारांना सादर करावे. ज्यामध्ये अयशस्वी झाल्यास ''माझा अशील'' असे गृहीत धरेल की ''नमूद मालमत्तेबद्दल'' कोणतेही प्रतिकूल दावे किंवा आक्षेप अस्तित्वात नाहीत किंवा ते अस्तित्वात असल्यास, ते यापुढे माफ केले जातील आणि अशा परिस्थितीत ''माझा अशील'' पुढे जाईल आणि दोन्ही पक्षांनी ठरवल्याप्रमाणे विक्रीचा व्यवहार पूर्ण करेल याची कृपया नोंद घ्यावी.

शेड्युल ''ए''

आरसीसी प्लिंथ क्रमांक १,२,३ आणि ४ मध्ये इमारत क्रमांक ए-१, कृष्णा कॉम्प्लेक्स, सोनाळे, भिवंडी, सर्व्हे क्रमांक १६८, हिसा नं.ए-१ गाव सोनाळे, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे व इमारत क्रमांक १०१, १०२, १०३ आणि १०४ वरील आरसीसी प्लिंथ इमारत क्रमांक ए-१, कृष्णा कॉम्प्लेक्स, सोनाळे, भिवंडी, सर्व्हे क्रमांक १६८, हिसा नं.ए-१ गाव सोनाळे, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे.

ॲडवोकेट
सौ. शमिका सागर रानडे
दुसरा मजला, कार्यालय क्रमांक ९ आणि १०,२६, समर्थ सदन,
डॉ. डी. डी. साठे मार्ग, गिरगाव, मुंबई-४०० ००४
कार्यालय संपर्क क्रमांक :९८७०५७६१०८४

ठिकाण:- मुंबई
तारीख: -०३.११.२०२२

कब्जा सूचना

एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लि.

सीआयएन : यु६७१००एमएच२००७पीएलसी१७४७५९
रिटेल मध्यवर्ती आणि नोंद. कार्यालय : एडलवैस हाऊस, सीएसटी रोड लगत, कलिना, मुंबई - ४०००९८

ज्याअर्थी खालील तारण धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ॲक्ट), २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट), रुल्स २००२ चा (रुल ३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील नमूद मागणी सूचना जारी करून कर्जदारांना सदर सूचनांच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम परतफेड करण्यासाठी बोलावित आहेत.

त्यानंतर, या मधील नमूद अभिहस्तांकनकर्त्यांनी **खालील इएआरसी ट्रस्ट एससी-३७१ चे विश्वस्त** म्हणून त्यांच्या क्षमतेत कार्यरत असलेल्या **एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (यानंतर इएआरसी असा उल्लेख)** कडे खालील नमूद वित्तीय मत्ता अभिहस्तांकित केली आहे. सरफैसी ॲक्ट, २००२ चे कलम ५ अन्वये निष्पादित केलेल्या अभिहस्तांकन करारानुसार, **ईएआरसी**, अभिहस्तांकनकर्त्याच्या जागी आले आणि वित्तीय मत्तांसंबंधीचे अभिहस्तांकनकर्त्याचे सर्व अधिकार, हक्क आणि हितसंबंध यासह कर्जदारांद्वारे घेतलेल्या वित्तीय सहाय्याचे संबंधी तारण हितसंबंध, हमी, ताबे गहाण **ईएआरसीकडे** निहित झाले आहेत आणि **ईएआरसी**, तारण धनको म्हणून त्यांच्या सर्व अधिकारांचा वापर करीत आहेत.

कर्जदारांनी रक्कमेची परतफेड करण्यात कसूर केली आहे. याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी **एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडचे** प्राधिकृत अधिकारी या नात्याने ॲक्टचे कलम १३ चे पोट-कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक मिळकतीसमोर नमूद केलेल्या तारखे रोजीस खालील नमूद मिळकतीचा कब्जा घेतला आहे.

अनु. क्र.	अभिहस्तांकनकर्त्यांचे नांव	ट्रस्टचे नाव	कर्ज खाते क्र.	कर्जदारांचे नाव आणि सह कर्जदारांचे नाव	मागणी सूचनेची रक्कम आणि तारीख	कब्जाची तारीख	कब्जाचे प्रकार
१	दिवाण हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (डीएचएफएल)	ईएआरसी ट्रस्ट एससी - ३७१	१३४७७५२	१) फैझल अब्दुल अझिझ निझामी (कर्जदार) २) सोहेल अब्दुल अझिझ निझामी (सह-कर्जदार) ३) राबिया अब्दुल अझिझ निझामी (सह-कर्जदार) ४) रुबिना फैझल निझामी (सह-कर्जदार)	रु. २,३२,९३,९४३/- (रुपये दोन कोटी बत्तीस लाख त्र्याण्णव हजार नऊशे त्रेचाळीस मात्र) आणि २९-०३-२०१८	०१-११-२०२२	प्रत्यक्ष कब्जा

मिळकतीचे वर्णन : मुंबई उपनगरामधील बंदिवलीच्या सर्वे क्र. २२, हिस्सा क्र.१(भाग), सीटीएस क्र. ७४ए (म्हणजेच ७४, ७४/१ ते ७४/१५(भाग) धारक मोजमापीत ४७९९.१० चौ.मी येथे स्थित रेहान टेरेस अशा ज्ञात परिसर धारक ३रा मजला येथील मोजमापीत ७३७ चौ.फु. (चटई क्षेत्र) विंग ए मधील फ्लॅट क्र.३०३ सह टेरेस १२०३.४ चौ.फु. (चटई क्षेत्र) चे सर्व ते भाग आणि विभाग आणि सीमाबद्ध- उत्तर: बांदिवली हिल रोड, दक्षिण: सीटीएस क्र.९९ धारज डीपी रोड, पूर्व: सीटीएस क्र.७४(भाग), पश्चिम: सीटीएस क्र.७५

तारणमत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध असलेल्या वेळेसंबंधी ॲक्टचे कलम १३ चे पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.
विशेषत : कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना मिळकतीशी व्यवहार न करण्याबाबत सावधान करण्यात येत आहे आणि मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार खालील नमूद रक्कम आणि त्यावरील व्याजाकरिता **एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडच्या** भाराअधीन राहील.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०२.११.२०२२
सही/- प्राधिकृत अधिकारी
एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

Edelweiss Ideas create, values protect | ASSET RECONSTRUCTION

ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालय: आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९, इंडिया

शाखा कार्यालय: २ रा मजला, कार्यालय २०४, जंक्शन ४०६, प्लॉट क्र. ४०६/१बी, टक्का रोड, पनवेल पश्चिम - ४१०२०६
शाखा कार्यालय : २ रा मजला, कार्यालय क्र. २०१, सी.एस. क्र. १३६०४/८०, सिद्धिविनायक हाऊस, हॉटेल ॲम्बेसडर जवळ, सांगली मिरज रोड, सांगली - ४१६ ४१६
शाखा कार्यालय : १ ला मजला, कार्यालय क्र. २३, २४, २५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतीम प्लॉट क्र. २९, उप प्लॉट क्र. १, राधिका रोड, करंजे तर्फे, सातारा - ४१५००२

(नियम ८ (६) साठी परंतुके पहा)

स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८(६) च परंतुकान्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना
सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा **प्रत्यक्ष कब्जा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदार/कायदेशीर वारसदारांचे नाव/ कर्ज खाते क्र.	तारण मत्तेचा तपशील सह काही असल्यास ज्ञात भार	थकीत रक्कम	राखीव किंमत / इसारा अनामत रक्कम	मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख व वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१.	विश्वास वामन मोरे (कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएएनई००००१३१२०२२ एलएचएएनई००००१३१२०२१	फ्लॅट नं. १०३, १ ला मजला, कृष्णा क्लासिक सीएचएसएल, प्लॉट नं. २८, सेक्टर ३४बी, पोद्दार जंबो किड्स जवळ, जीएस स्कीम खारघर, नवी मुंबई- ४१०२२१	रु. ४४,५१,९८८/- १ नोव्हें, २०२२	रु. ३७,०८,०००/- रु. ३,७०,८००/-	१५ नोव्हें, २०२२ स. ११:०० ते दु. ०३:००	१८ नोव्हें, २०२२ दु. ०२:०० ते दु. ०३:००
२.	दत्तात्रय सदाशिव कदम (कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएसएलआय००००१२९९०००	सीटीएस क्र. १४२, मालभाग, मु.पो. बुधगाव, ता. मिरज, जिल्हा - सांगली, महाराष्ट्र	रु. १७,७४,०१२/- १ नोव्हें, २०२२	रु. २८,८०,०००/- रु. २,८८,०००/-	१५ नोव्हें, २०२२ स. ११:०० ते दु. ०३:००	१८ नोव्हें, २०२२ दु. ०२:०० ते दु. ०३:००
३.	सारिका रामदास पवार (कर्जदार) कर्ज खाते क्र. एनएचएसआरए००००१२७३८४०	प्लॉट क्र. ५३, गट क्र. १५३ १, मनोरथ नगरी, जिल्हा- सातारा, राज्य- महाराष्ट्र	रु. ९,०४,४६६/- १ नोव्हें, २०२२	रु. ३,९२,०००/- रु. ३९,२००/-	१५ नोव्हें, २०२२ स. ११:०० ते दु. ०३:००	१८ नोव्हें, २०२२ दु. ०२:०० ते दु. ०३:००

ऑनलाईन लिलाव हा लिलाव एजन्सी **ऑक्शन टायगरची** वेबसाईट **(युआरएल लिंक-https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/)** वर करण्यात येईल. गहाणदार/नोटीसी यांना **१७ नोव्हेंबर, २०२२ रोजी सायं. ५.००** पूर्वी पर्यंत पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे, अन्यथा तारण मत्ता वरील वेळापत्रकाप्रमाणे विकण्यात येईल.
संभाव्य बोलीदारांनी **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, २ रा मजला, कार्यालय २०४, जंक्शन ४०६, प्लॉट क्र. ४०६/१बी, टक्का रोड, पनवेल पश्चिम - ४१०२०६** येथे इसारा अनामत रक्कम (इअरच्या) आरटीजीएस/ डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई मध्ये उल्लेखित) **१७ नोव्हेंबर, २०२२ दु. ४.०० पूर्वी** सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी की, जर संभाव्य बोलीदारांना जर वरील नमूद वेळेत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसेल तर निविदा दस्तावेजांची सही केलेले प्रत **१ डिसेंबर, २०२२, सायं. ५.०० पूर्वी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, २ रा मजला, कार्यालय २०४, जंक्शन ४०६, प्लॉट क्र. ४०६/१बी, टक्का रोड, पनवेल पश्चिम - ४१०२०६** येथे सादर करावी. इसारा अनामत रकमेचा डिमांड ड्राफ्ट (डीडी) **पनवेल, सांगली, सातारा** येथे देय '**आयसीआयसीआय होम फायनान्स कं